दै. वतनवाला 16. 10 ..

# ग्रामीण पोलीसांनी केले अनोळखी बेवारास ईसमावर अंत्यसंस्कार

**नांदेड (प्रतिनिधी)**

ग्रामीण पोलीस स्टेशन हदीतील असरजन चौक भागात अनोळखी ४७ वर्षांचा ईसम हा मृत अवस्थेत आढळल्या नंतर पोलीस सहाय्यक उपनिरीक्षक गिते जि.एन. यांनी शासकीय रुग्णालयात शवविच्छेदन करून अंत्यसंस्कार केले,या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली.

फिर्यादी लक्ष्मण पिंनलवाड यांनी ग्रामीण पोलीस स्टेशन येथे या प्रकरणी खबर दिली यात त्यांनी ५ फेब्रुवारी रोजी रात्री हाटेल बंद करून झोपी गेलो असता सकाळी ६ फेब्रुवारी रोजी ८ वाजता बाथरूम साठी जात असतांना ४७ वर्ष असलेला एक पुरुष जातीचा ईसम अंगावर कपडे नसलेला मरण पावलेल्या अवस्थेत दिसल्या नंतर ग्रामीण पोलीस स्टेशन खबर दिली.

मृत ईसमाचे वर्णण गोरा असुन पोषाख निळा फिकट रंगाच्या टि शर्ट व निळ्या रंगाची अंडरवेल,सडपातळ बांधा,ऊची पाच फुट व केस अर्धवट टक्कल व काळे पांढरे वरील ईसमाचे शव विच्छेदन करून मृतदेह ओळख पटण्यासाठी ठेवण्यात आला होता, परंतु ओळख न पटल्याने मयतावर ग्रामीण पोलीस स्टेशन चे प्रभारी पोलिस निरीक्षक सैदाणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस उपनिरीक्षक निरीक्षक जी.एन.गिते व पोलीस अंमलदार केशव सांगळे यांनी नांदेड येथील डंकिन या ठिकाणी मृतदेहावर अंत्यसंस्कार केले.

या प्रकरणी ग्रामीण पोलीस स्टेशन येथे आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे,या प्रकरणी संबंधित ईसमा बाबत काही माहिती असल्यास ग्रामीण पोलीस स्टेशन येथे संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.